लोकमत

## शालेय विद्यार्थ्यांसाठी 'एक्सायटिंग सायन्स ग्रुप': येत्या २४ जून रोजी कार्यशाळा

# वैज्ञानिक संशोधन जाणून घेण्याची संधी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** शालेय विद्यार्थ्यांना संशोधन म्हणजे नेमके काय, प्रयोगशाळा म्हणजे काय, त्यामध्ये संशोधक कसे काम करतात , पीएच.डी. कशा प्रकारे केली जाते, या सर्वांबद्दल जवळून ओळख व्हावी, तसेच त्यांच्यातील विज्ञानाबद्दल गोडी निर्माण व्हावी आणि त्यांची उत्सुकता कायम राहावी या उद्देशाने एक्सायटिंग सायन्स ग्रुपतर्फे दरवर्षी समर इंटर्नशिप प्रोग्राम घेण्यात येतो. त्यामध्ये विद्यार्थ्यांना विज्ञानविषयक माहिती जाणून घेता येते.

सीएसआयआर आणि आयसर, पुणे येथे कार्यरत असणारे शास्त्राज्ञ स्वयंप्रेरणेने गेली १० वर्षे 'एक्सायटिंग सायन्स ग्रुप' चालवत आहेत. या संस्थेद्वारे मुलांना विज्ञानविषयी आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. महिन्यातून एकदा मोफत असे विज्ञानविषयक व्याख्यान आयसर पुणे येथे आयोजित केले जाते.

यापुढील विज्ञान व्याख्यान हे २४ जून रोजी सकाळी १० ते ११.३० या वेळेत या 'द मिल्टिकलर युनिर्व्हस' या विषयावर न्यू लेक्चर हॉल, इंद्राणी बालन सायन्स ॲक्टिव्हिटी सेंटर, आयसर, पुणे येथे होणार आहे. या ग्रुपला फोर्ब्स मार्शल फाउंडेशन, प्राज फाउंडेशन, नाग फाउंडेशन आणि पर्सिस्टंट फाउंडेशन यांनी सहकार्य केले आहे. मागील वर्षीप्रमाणे या वर्षीदेखील त्यांनी समर इंटर्नशिप प्रोग्राम हा उपक्रम राबविला, यात पुण्यातील महापालिकेच्या, हुतात्मा बालवीर शिरीषकुमार विद्यालयामधील दोन विद्यार्थ्यांचा समावेश होता. त्यांना आयसरच्या प्रयोगशाळेत काम करण्याची संधी मिळाली.

या मुलांनी यावर्षी त्यांच्या प्रकल्पाचा भाग म्हणून विविध खंडांमधील वेगवेगळ्या पर्वत रांगा आणि नद्या यांचा अभ्यास केला. डॉ. चेतन गाडगीळ (संशोधक- सीएसआयआर - एनसी एल ) यांनी मुलांना या काळात मार्गदर्शन केले. मुस्कान सिंग आणि सूरज थोरात (हुतात्मा बालवीर शिरीषकुमार विद्यालय) असे त्या विद्यार्थ्यांची नावे आहेत.



विद्यार्थ्यांसह आयसरमधील संशोधक.

### एक्सायटिंग सायन्स ग्रुपसाठी नोंदणी

एक्सायटिंग सायन्स ग्रुपच्या असोसिएट गायत्री क्षीरसागर या उपक्रमाविषयी माहिती देताना म्हणाल्या, ग्रुपच्या कार्यक्रमासाठी मोफत नाव नोंदणी करण्यासाठी www.excitingscience.org या वेबसाईटला भेट द्या. एक्सायटिंग सायन्स ग्रुपद्वारे पुणे महापालिकेच्या काही शाळांमध्ये सायन्स क्लब घेतले जातात. उन्हाळ्यामध्ये विविध वर्कशॉप्सचे सुद्धा आयोजन केले जाते.